**L. C. BILL No. II OF 2023.**

*A BILL*

TO PROVIDE FOR PAYMENT OF PENSION TO FARMERS HAVING ONE HECTARE OR LESS THAN ONE HECTARE AGRICULTURAL LAND IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.**

**महाराष्ट्र राज्यातील एक हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जिरायती / बागायती जमीन क्षेत्र असलेल्या अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील एक हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जिरायती / बागायती जमीन क्षेत्र असलेल्या अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.



(शा.म.मु.) एचबी २७२१—१ (२००-३-२०२३)

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) “ अल्पभूधारक शेतकरी ” म्हणजे, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या सातबाऱ्याच्या उताऱ्यावर एक हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या जिरायती किंवा बागायती जमिनीची नोंद आहे, असा शेतकरी ;

(ख) “ निवृत्तीवेतन ” याचा अर्थ, कलम ४ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या निवृत्ती वेतनाची रक्कम असा आहे,

(ग) “ शासन ” किंवा “ राज्य शासन ” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(घ) “ नियम ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

(ङ) “ विहित ” याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

निवृत्तीवेतन मिळण्यासाठी पात्रता.

**३.** (१) खालील अटी व शर्ती पूर्ण करणारे अल्पभूधारक शेतकरी निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतील :—

(क) शेतकरी, निवृत्तीवेतन मिळण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्यामधील रहिवासी असावा ;

(ख) शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर एक हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जिरायती किंवा बागायती जमिनीची नोंद असावी ;

(ग) शेतकऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबियांना राज्य किंवा केंद्र शासन किंवा शासनाच्या किंवा निमशासकीय संस्थांतर्फे कोणत्याही योजनांसाठी निवृत्तीवेतन मिळत नसावे ;

(घ) दुष्काळ, अतिवृष्टी इतर नैसर्गिक परिस्थितीमुळे शेतकऱ्यास कमीत कमी सलग ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी दरम्यान जिरायती / बागायती शेतजमिनीतून कोणतेही कृषी उत्पन्न प्राप्त झालेले नसावे ;

(ङ) अल्पभूधारक शेतकरी ज्या दिनांकास निवृत्तीवेतनासाठी अर्ज करेल, त्यांना दिनांकास त्याचे वय ६५ वर्षांपेक्षा कमी नसावे.

(२) या अधिनियमान्वये, वरील अटी व शर्ती पूर्ण करणारा शेतकरी निवृत्ती वेतन मिळण्यासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करील.

निवृत्तीवेतन देणे.

**४.** ज्या शेतकऱ्यांनी कलम ३ मधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता केली आहे, अशा प्रत्येक शेतकऱ्यास, कमीत कमी दरमहा तीन हजार रुपये निवृत्तीवेतन देण्यात येईल. सदर निवृत्तीवेतनाची रक्कम त्या अल्पभूधारक शेतकऱ्याला त्याच्या हयात असे पर्यंत मिळेल.

निवृत्तीवेतन घेण्यास अपात्र होणे.

**५.** जे शेतकरी कलम ३ मधील अटी व शर्तींची पूर्तता करीत नसतील, असा प्रत्येक शेतकरी निवृत्तीवेतन घेण्यास अपात्र असेल.

नियम तयार करण्याचा अधिकार.

**६.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) ह्या अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्या गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

प्रत्येक वर्षी राज्यात ओला दुष्काळ, सुका दुष्काळ, अतिवृष्टी, अवेळी पडणारा पाऊस, वादळ, गारपीट अशा कारणांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे म्हणजेच कापूस, तूर, हरभरा इतर कडधान्य, केळी, फळबागा, ज्वारी, बाजरी, आंबा, संत्रा, मोसंबी, भाजीपाला इत्यादी जिरायती व बागायती पिकांचे नुकसान होते. शासनाकडून नुकसान भरपाईकरिता आर्थिक मदत वेळीच दिली जात नाही. नुकसानाचा अंदाज प्रत्यक्ष शेतावर जाऊन न करता कार्यालयात बसून कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून अहवाल मागवून घेतल्यामुळे, झालेले नुकसान व त्यानुसार मिळणारी आर्थिक मदत यामध्ये तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकरी त्यांच्या उदरनिर्वाहासाठी, शेती विकासासाठी व मुलींच्या लग्न कार्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतो. नैसर्गिक आपत्तीमुळे नापिकी वा अन्य कारणांमुळे सावकाराचे कर्ज वेळीच फेडता न आल्याने व शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम सरकारी कार्यालय व बँकाकडे कर्जासाठी फेऱ्या घालूनही न मिळाल्यामुळे शेतकरी गळफास लावून आत्महत्या करतो, अशा परिस्थितीमध्ये बदल होणे आवश्यक आहे. यामध्ये १ हेक्टर अथवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांचे हाल होतात. अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या राज्यात मोठ्या प्रमाणात आहे. याशिवाय सरकारी मदतीसाठी त्यांचे जमिनीचे क्षेत्र कमी असल्यामुळे किंवा शासनाने विहित केलेली आर्थिक मदत, कर्जमाफी अशा शासनाने जाहीर केलेल्या योजनांच्या निकषामध्ये ते बसू शकत नाही. परिणामी, त्यांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागते. ही बाब विचारात घेता राज्यात १ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना वृद्धापकाळात निसर्गाच्या लहरीपणामुळे निर्माण होणाऱ्या संकटांना सामोरे जावे लागते. अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांना आपला व कुटुंबांचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी दरमहा व नियमितपणे काही ठराविक रक्कम निवृत्ती वेतन म्हणून देण्याच्यादृष्टीने शासनाने निश्चित स्वरुपाची उपाययोजना करणे आवश्यक आहे. म्हणून ज्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या नावे असलेल्या सात-बारा उताऱ्यावर १ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्र आहे, ज्यांचे वय ६५ वर्ष पूर्ण झालेले आहे, ज्या शेतकऱ्यास केंद्र अथवा राज्य शासनाकडून अथवा उपक्रमाकडून कोणत्याही प्रकारचे निवृत्तीवेतन मिळत नाही, अशा शेतकऱ्यांना दरमहा रु. ३०००/- इतके निवृत्तीवेतन देण्याबाबत तरतूद करणे आवश्यक आहे.

वरील उद्देश साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १७ जानेवारी, २०२३.

**अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :-

**खंड ६ (१) –** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्याच्या शर्तीच्या अधीन राहून नियम करता येईल.

वरील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचा आहे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.]**

**[महाराष्ट्र राज्यातील एक हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जिरायती / बागायती जमीन क्षेत्र असलेल्या अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई